# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये झालेले द्वितीय अपिल

## अपिल क्रमांक : केआर -१४०७/२०१७ मधील तक्रार क्र. ३८७/२०१८

अपिलार्थी, श्री. मनोज दामोदर पाटील
मु. पो. बोईसर (पोस्ट ऑफीस बिल्डींग), ता. जि. पालघर - ४०१५०१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद पालघर,
ता. जि. पालघर - ४०१५०२.

जन माहिती अधिकारी, कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद पालघर,
ता. जि. पालघर - ४०१५०२.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०८/१२/२०१७**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०२/०२/२०१७ | -- | १०/०३/२०१७ | -- |

अपिलार्थी यांनी आयोगास सादर केलेल्या दिनांक २१/०४/२०१७ रोजीच्या द्वितीय अपिलावर आज दिनांक ०८/१२/२०१७ रोजी फास्ट ट्रॅक सुनावणी (Fast Track Hearing) घेण्यात आली. सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान विशद केले की, त्यांच्या दिनांक ०२/०२/२०१७ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही.

त्यावर जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणी दरम्यान विशद केले की, अपिलार्थी यांना दिनांक ०७/१२/२०१७ रोजी उपलब्ध माहिती देण्यात आली आहे. आता माहिती सोबत आणली आहे, ती देता येईल. दि.२६/०९/२०१६ रोजी एक वेतनवाढ रोखण्यात आली होती. आयोगाच्या आदेशाप्रमाणे सदर कार्यवाही करण्यात आली होती.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७ (६) व ७(९) मधील तरतुदीच्या अनुषंगाने, **अपिलार्थीस उपलब्ध माहिती १५ दिवसात नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
**(थँक्सी फ्रान्सिस थेकेकरा)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०८ डिसेंबर, २०१७.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
प्रथम अपिलीय प्राधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद पालघर, ता. जि. पालघर - ४०१५०२.

**विवेचन**

तक्रारकर्ता श्री. मनोज दामोदर पाटील यांनी द्वितीय अपिल क्रमांक के.आर १४०७/२०१७ मध्ये आयोगाने दिनांक ०८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने, त्यांना दिशाभूल करणारी माहिती दिलेली असल्याने आयोगाकडे दि. ३.४.२०१८ रोजी कलम १८ (१) (ङ) खाली तक्रार दाखल केली आहे. या अपिलासंदर्भातील नस्तीवरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जि.प. पालघर यांनी आयोगाच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना परिपूर्ण माहिती दिलेली नसल्याची प्राथमिकरित्या आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहेत.

KOKAN BANCH

## आदेश

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जि.प. पालघर यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १०.२.२०१७ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन आयोगाने दिनांक ०८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने दिशाभूल करणारी माहिती पुरविली असल्याने त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये शास्तीची कारवाई का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(के.एल.बिश्नोई)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ जानेवारी, २०२१.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. प्रथम अपिलीय प्राधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद पालघर, ता. जि. पालघर - ४०१५०२.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जि.प. पालघर यांना विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जि.प. पालघर यांचेमार्फत प्रत रवाना.

**अपिल क्रमांक : केआर -१४०७/२०१७ मधील तक्रार क्र. ३८७/२०१८**

अपिलार्थी, श्री. मनोज दामोदर पाटील

**सुनावणी** दिनांक ४.१२.२०२३ **( In Continuation of order dt.२२.१.२०२१ )**

## विवेचन

उपरोक्त आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम-२० (१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण ३० दिवसांत आयोगास सादर करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.

सदर सुनावणीस तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. प्रमोद भास्करराव कहू, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद पालघर आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुनिल सिताराम वाडेकर, कनिष्ठ प्रशासन अधिकारी आणि भूषण तरे हयांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

**सुनावणीचा तपशील :**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. प्रमोद भास्करराव कहू, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांनी दि.९.४.२०२१ रोजीच्या पत्रान्वये आयोगास लेखी खुलासा सादर केला की, अपिलार्थी यांचा सदरचा माहिती अर्ज त्यांच्याकडे वर्ग न झाल्यामुळे व सदरचा अर्ज हा शिक्षण विभागाशी संबंधित असल्यामुळे परस्पर आवक जावक विभागाकडील कार्यासनाकडून संबंधित शिक्षण विभागाकडे पाठविण्यात आले सबब, यामध्ये त्यांची काहीही चुक नसल्यामुळे त्यांच्यावर शास्ती लादण्यात येऊ नये अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## आदेश

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. प्रमोद भास्करराव कहू, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांनी सादर केलेला खुलासा व त्यासोबतच्या कागदपत्रांवरून आयोगाचे समाधान झाले असून त्यांचा दि.९.४.२०२१ रोजीचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. त्यांना २२.१.२०२१ रोजीच्या निर्णयातील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस मागे घेण्यात येत आहे. प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

**(भूपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ४ डिसेंबर, २०२३

KOKAN BANCH